लोकमत

**विदेशी भाषा विभाग : 'विथ लव फ्रॉम रशिया' कार्यक्रमाचे सादरीकरण; भेटवस्तूही दिल्या**

# शिवाजी विद्यापीठ भेटीने रशियन विद्यार्थी भारावले

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** रशियातील विद्यार्थी आणि शिक्षक हे शिवाजी विद्यापीठाच्या भेटीने बुधवारी भारावले. विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील विद्यार्थ्यांनी रशियन भाषेत स्वागत केल्याने त्यांच्या चेहऱ्यावर आनंद पसरला होता.

मिनिस्ट्री ऑफ फॉरेन अफेअर्स, मॉस्को, रशियन फेडरेशन या माध्यमिक शाळेतील शिक्षक चुबारोवा तत्याना, नतालिया बुरत्सेवा, पलिना बुदीर्ना, इरिना बिस्पालवा यांच्या समवेत बारा विद्यार्थी बुधवारी सायंकाळी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागात दाखल झाले. यावेळी या विभागातील विद्यार्थ्यांनी रशियन भाषेत त्यांच्याशी संवाद साधत त्यांचे स्वागत केले. विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी विभागाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी रशियातील विद्यार्थ्यांनी काही पुस्तके, कॅलेंडर आणि भेटवस्तू विभागासाठी डॉ. पानसरे यांच्याकडे प्रदान केल्या. यावेळी संवाद साधताना भारताला पुन्हा भेट द्यायला आवडेल. भारत आणि रशियातील मैत्री अबाधित राहावी, अशा अपेक्षा व्यक्त केल्या. विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाने रशियातील काही साहित्याची मराठीतील अनुवादित पुस्तके पाहून हे विद्यार्थी आनंदित झाले. विभागाने मराठीतील पुस्तके या विद्यार्थ्यांना दिली. यावेळी शीतल कुलकर्णी, स्नेहा वझे, प्रियांका माळकर, स्नेहल शेटे, उपस्थित होते.



**शिवाजी विद्यापीठातील विदेशी भाषा विभागाला बुधवारी सायंकाळी रशियातील शालेय विद्यार्थी, शिक्षकांनी भेट दिली. त्यांचे स्वागत विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी केले.**

## सांस्कृतिक कार्यक्रम रंगला

**विदेशी भाषा विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'विथ लव फ्रॉम रशिया' हा सांस्कृतिक कार्यक्रम वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये झाला. त्यात रशियातील विद्यार्थ्यांनी त्यांच्या पारंपरिक वेशभूषा करुन नृत्य सादर केले. सुमारे दीडतास हा कार्यक्रम रंगला. त्यानंतर त्यांनी विद्यापीठातील विद्यार्थ्यांसमवेत संवाद साधला.**

लोकमत

## प्रवीण पाटील; शिवाजी विद्यापीठात पत्रकारिता विद्यार्थी काँग्रेसचा समारोप

# फेक न्यूज नियंत्रणासाठी कायद्याचा अंमल हवा

लोकमत न्यूज नेटवर्क

कोल्हापूर : फेक न्यूज रोखण्यासाठी सध्या अस्तित्वात असलेले कायदे पुरेसे आहेत. मात्र, त्यांचा प्रभावी अंमल करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन शहाजी लॉ कॉलेजमधील सहायक प्राध्यापक डॉ. प्रवीण पाटील यांनी बुधवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता व जनसंवाद विभागातर्फे आयोजित राज्यस्तरीय पत्रकारिता विद्यार्थी काँग्रेसमध्ये ते बोलत होते. विद्यापीठाच्या निलांबरी सभागृहातील या कार्यक्रमास माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ विनायक राजाध्यक्ष उपस्थित होते. डॉ. पाटील म्हणाले, भारतीय राज्यघटना,



शिवाजी विद्यापीठात बुधवारी पत्रकारिता विद्यार्थी काँग्रेसमध्ये सहायक प्राध्यापक डॉ. प्रवीण पाटील यांनी मार्गदर्शन केले.

भारतीय दंड संहिता, माहिती तंत्रज्ञान कायदा आणि सर्वोच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेले निकाल विचारात घेतले तर फेक न्यूज रोखण्यासाठी नवीन कायदा करण्याची गरज नाही. या सर्व कायदे, तत्त्वांचे काटेकोर पालन केले तर अशा प्रकारांना आळा बसू शकतो. माहिती तंत्रज्ञान तज्ज्ञ राजाध्यक्ष म्हणाले, फेक न्यूजची निर्मिती नेमकी कोणी केली, याची माहिती मिळविणे कठीण जात आहे; परंतु फेक न्यूजचा प्रसार करणे टाळणे आपल्या हातात आहे. इंटरनेटचा प्रसार जसजसा वाढत जाईल तसतसा फेक न्यूजचा प्रसारही वाढेल. त्यामुळे जनजागृती, काळजी घेणे जरुरीचे आहे.या कार्यक्रमास डॉ. शिवाजी जाधव, राजेंद्र पारिजात, श्रीहरी देशपांडे, सुमेधा साळुंखे, तेजस्विनी कांबळे, आनंदा कांबळे, आदी उपस्थित होते. सुप्रिया शेलार यांनी मनोगत व्यक्त केले. विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी स्वागत केले. अनुराधा इनामदार यांनी सूत्रसंचालन केले.

### तन्मयी सवदी, दिग्विजय कुंभार यांना पुरस्कार

या कार्यक्रमात संगीत व नाट्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांचा सत्कार करण्यात आला. मुंबईची तन्मयी सवदी आणि एम. ए. मास कम्युनिकेशनचा विद्यार्थी दिग्विजय कुंभार यांना विभागून बेस्ट रिसर्च पेपर अवॉर्ड देण्यात आले. त्यानंतर विद्यार्थी काँग्रेसचा समारोप झाला.

### संघटितपणे लढा हवा

दुपारच्या सत्रात पुणे विद्यापीठातील पत्रकारिता व जनसंवाद विभागातील सहायक प्राध्यापक संजय तांबट म्हणाले, संघटितपणे लढा दिला तर निश्चितपणे फेक न्यूजवर नियंत्रण मिळविता येईल. पत्रकार विवेक वाघमोडे म्हणाले, इंटरनेटच्या माध्यमातून जी मिळते, ती सर्वच माहिती खरी, वस्तुनिष्ठ असत नाही. ती तपासणे आवश्यक आहे.

सकाळ

# महाविद्यालयांत कमवा व शिका योजना

## सुवर्णमहोत्सवी वर्षात सर्वच महाविद्यालयांत होणार सुरू, मार्गदर्शक नियमावलीला आकार

संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा

**कोल्हापूर, ता. ३० : शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित ३० महाविद्यालयांत 'कमवा व शिका' योजना विस्तारली असून, येत्या जून-२०१९ पासून संलग्नित सर्वच महाविद्यालयांत ही योजना सुरू केली जाणार आहे. त्याकरिता मार्गदर्शक नियमावली तयार केली जात आहे. यंदा विद्यापीठातील योजनेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष असल्याने ते साजरे करण्यासाठी निश्चित आराखडाही तयार केला जात आहे.**

विद्यापीठाचे पहिले कुलगुरू डॉ. आप्पासाहेब पवार यांच्या संकल्पनेतून विद्यापीठात १९६८-६९ ला 'कमवा व शिका' योजना सुरू झाली. पिठाची गिरणी, वीट भट्टी, ऊस व भाजीपाला शेतीत विद्यार्थी काम करत होते. हळूहळू कामाचे स्वरूप बदलत जाऊन आता झेरॉक्स मशिन, वसतिगृहातील मेस, बागकामासह परीक्षा विभागातील छोटी-छोटी कामे विद्यार्थ्यांकडून केली जात आहेत. त्या मोबदल्यात त्यांना विद्यापीठात राहण्याची व जेवणाची सोय केली जाते, तसेच त्यांना वैद्यकीय सेवाही पुरवली जाते.



### विधायक

यंदा योजनेचे सुवर्णमहोत्सवी वर्ष असून, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ कायदा २०१६ अंतर्गत सर्वच महाविद्यालयांत नॅकच्या दृष्टीने ही योजना सुरू करण्याबाबत सूचना केली आहे. मार्च २०१८ला या विषयावर चर्चाही होऊन महाविद्यालयांत ही योजना सुरू करण्यासाठी आदेश द्यावेत, असे सांगण्यात आले होते. त्यानंतर प्राचार्यांच्या बैठकीत तसे आवाहन केले होते. त्याला ५१ महाविद्यालयांनी प्रतिसाद दिला होता. प्रत्यक्षात ३० महाविद्यालयांत ही योजना सुरू झाली आहे. योजनेचे समन्वयक प्रा. संभाजी शिंदे प्रत्येक महाविद्यालयात योजना सुरू व्हावी, याकरिता मार्गदर्शक नियमावली तयार करत आहेत. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के म्हणाले, ''येत्या शैक्षणिक वर्षात संलग्नित सर्व २९३ महाविद्यालयांत ही योजना सुरू व्हावी, हे टार्गेट आहे.

### दृष्टिक्षेपात

- विद्यापीठात १९६८-६९ ला कमवा व शिका योजना सुरू
- प्रवेश क्षमता १२० विद्यार्थी-विद्यार्थिनी
- विज्ञान शाखेकडे विद्यार्थ्यांची कामाची वेळ सकाळी ६ ते ९
- वाणिज्य व कला शाखेकडे विद्यार्थ्यांची कामाची वेळ दुपारी ३ ते ६
- होतकरू विद्यार्थ्यांसाठी योजना आधारवड
- प्रवेशासाठी उत्पन्नाचा दाखला, आधारकार्ड, रहिवासी दाखला, वैद्यकीय प्रमाणपत्र व दोन शिफारस पत्रे आवश्यक

### योजनेतून घडलेले मान्यवर

पोलिस अधीक्षक चंद्रकांत मोरे, माजी कुलगुरू डॉ. एस. एन. पठाण, लेबर कमिशनर अंकुश मोरे, बीसीयूडीचे संचालक डॉ. बी. एल. पाटील, प्राचार्य मानसिंगराव जगताप, अशोक जगताप, भैरव कुंभार व एस. जे. नाईक, फिजिक्स विभागातील डॉ. सी. एच. भोसले, उपप्राचार्य टी. एस. सरगर असे अनेक विद्यार्थी या योजनेतून घडले आहेत. या योजनेचे विद्यार्थी विद्यापीठात प्रशासकीय स्तरावर कामही करत आहेत.

# विद्यापीठात फेटा डे...



अर्जुन टाकळकर

सध्या कॉलेज कॅम्पसमध्ये डेज मूड सुरू आहे. याच पंक्तीत सहभागी होत शिवाजी विद्यापीठातील गणित विभागातर्फे मंगळवारी फेटा डे साजरा करण्यात आला. पांढऱ्या रंगाचे कुर्ते व भगवे फेटे असा पेहराव करून मुलांनी विभागात प्रवेश केला. तर पांढऱ्या कुर्तीज, भगवा फेटा आणि सोबत चंद्रकोर टिकली आणि नथ अशा मऱ्हाठमोळ्या ढंगात विद्यार्थिनींनी हटके ट्रॅडिशनल डे साजरा केला.

पुढारी

# 'छत्रपती शिवाजी' पुरस्कारासाठी शोध समिती

## शिवाजी विद्यापीठात पुरस्कार निवड समितीची बैठक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने 'छत्रपती शिवाजी' पुरस्कार देण्यात येणार आहे. यासंदर्भात नियोजनाची दुसरी बैठक बुधवारी विद्यापीठात झाली. राष्ट्रीय व आंतराष्ट्रीय स्तरावर अत्युच्च कामगिरी करणाऱ्या व्यक्तीस हा पुरस्कार देण्यात येणार असल्याने बैठकीत मान्यवरांनी विविध मुद्द्यांवर चर्चा केली.

पुरस्कार व्यक्तीच्या निवडीसाठी चारसदस्यीय शोध समिती बैठकीत गठित करण्यात आली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे होते. नियोजनाची पुढील बैठक १ मार्च रोजी होणार असल्याचे कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी सांगितले.

बैठकीस दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर, 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष डॉ. यशवंत थोरात, डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे कुलपती डॉ. संजय पाटील, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, सिनेट सदस्य धैर्यशील पाटील, अमित कुलकर्णी, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. भारती पाटील आदी सदस्य उपस्थित होते.

शिवाजी विद्यापीठाच्या वतीने नियोजित 'छत्रपती शिवाजी' पुरस्कारासंदर्भात बुधवारी सकाळी विद्यापीठात बैठक झाली. यापूर्वी १९ ऑक्टोबर २०१८ रोजी झालेल्या बैठकीत झालेल्या निर्णयानुसार पुरस्कारासाठी प्रस्ताव मागवण्यात आले होते. यानुसार विविध क्षेत्रांतील मान्यवरांचे निवड समितीला ४९ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. बुधवारी या प्रस्तावांवर निवड समिती सदस्यांनी सविस्तर चर्चा केली.

संरक्षण, अर्थ, सामाजिक क्षेत्रांत राष्ट्रीय हितासाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीस हा पुरस्कार दिला जावा, अशी सूचना बैठकीत काही सदस्यांनी केली. यासह राष्ट्रीय एकात्मतेसाठी कार्य करणाऱ्या व्यक्तीचा प्राधान्याने विचार करावा, अशी सूचनाही केली. सदस्यांच्या सूचना आणि मतांवर सविस्तर चर्चा झाली.

युगपुरुष छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने हा पुरस्कार दिला जाणार असल्याने त्याची व्याप्ती ही राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय असल्याने यासाठी शोध समिती गठित करण्याच्या सूचनेवर सर्व सदस्यांनी एकमत दर्शविले. यानंतर निवड समितीतील चार जणांची शोध समिती गठित करण्यात आली. १ मार्च रोजी निवड समितीची पुढील बैठक होईल. पुढील बैठकीत पुरस्कारांची घोषणा होण्याची शक्यता आहे.

लोकमत

# विद्यापीठाकडून राष्ट्रीय पुरस्कारासाठी शोध समिती

## कुलगुरुंची माहिती; चार सदस्यांचा समावेश

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातर्फे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या नावाने राष्ट्रीय पुरस्कार दिला जाणार आहे. या पुरस्कारासाठी बुधवारी शोध समिती स्थापन करण्यात आली. या चार सदस्यीय समितीच्या अध्यक्षपदी 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष यशवंत थोरात हे आहेत.

शैक्षणिक, वैज्ञानिक, सामाजिक, सांस्कृतिक अशा विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कामगिरी केलेल्या व्यक्तीला शिवाजी विद्यापीठातर्फे 'छत्रपती शिवाजी महाराज पुरस्कार' देऊन सन्मानित केले जाणार आहे. त्याबाबत शोध समिती स्थापन करण्यासाठी विद्यापीठात बुधवारी बैठक झाली. अध्यक्षस्थानी कुलगुरु डॉ. देवानंद शिंदे होते. बैठकीस डॉ. अनिल काकोडकर, दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, 'नाबार्ड'चे माजी अध्यक्ष यशवंत थोरात, डी. वाय. पाटील शिक्षण संस्थेचे कुलपती डॉ. संजय डी. पाटील, ज्येष्ठ साहित्यिक डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, ज्येष्ठ इतिहासतज्ज्ञ डॉ. जयसिंगराव पवार, प्र-कुलगुरु डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव विलास नांदवडेकर, अधिष्ठाता डॉ. भारती पाटील, विद्यापीठ अधिसभा सदस्य धैर्यशील पाटील, अमित कुलकर्णी उपस्थित होते. त्यांनी पुरस्काराच्या अनुषंगाने विविध मुद्द्यांवर चर्चा केली. पुरस्काराच्या नियोजनाबाबतची पुढील बैठक दि. १ मार्चला होणार आहे, अशी माहिती प्रकुलगुरु डॉ. शिर्के यांनी माहिती दिली.

# प्राचार्य वाहूळ यांचे काम प्रेरणादायी

कोल्हापूर टाइम्स टीम

'सामाजिक समतेच्या कार्यामध्ये आयुष्य समर्पित करणाऱ्या प्राचार्य एम. ए. वाहूळ यांचे काम ग्रंथ स्वरुपात पुढच्या पिढीसाठी प्रेरणा म्हणून उपयोगी ठरेल,' असे कौतुकोद्‌गार शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी काढले.

## कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे प्रतिपादन



शिवाजी विद्यापीठ, माजी विद्यार्थी संघटना व सेवानिवृत्त प्राध्यापक-प्राचार्य संघटनेतर्फे आयोजित कार्यक्रमात बोलताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, सोबत प्राचार्य मानसिंगराव जगताप, डॉ. जे. एम. मंत्री, डॉ. एम. ए. वाहूळ, श्रीनिवास पाटील, प्राचार्य मोहम्मद शफी, व्ही.एन. शिंदे.

शिवाजी विद्यापीठ, माजी विद्यार्थी संघटना व सेवानिवृत्त प्राध्यापक-प्राचार्य संघटनेतर्फे उच्च शिक्षण विभागाचे माजी शिक्षण सहसंचालक प्राचार्य एम. ए. वाहूळ व प्राचार्य मोहम्मद शफी यांच्या अमृतमहोत्सवीनिमित्त गौरव सोहळा आयोजित केला होता. सिक्कीमचे माजी राज्यपाल डॉ. श्रीनिवास पाटील प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. वाहूळ यांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेऊन कुलगुरू शिंदे म्हणाले, 'वयाची सत्तर, पंच्याहत्तरी ओलांडलेल्या डॉ. वाहूळ व त्यांचे सहकारी प्राचार्य शफी, डॉ. जे. एम. मंत्री, प्राचार्य एस. बी. नाफडे हे प्राचार्य, प्राध्यापकांसाठी 'ॲक्युरॅट' संघटना स्थापून वेगवेगळे उपक्रम राबवित आहेत. हे निश्चितच प्रेरणादायी आहे.'

माजी राज्यपाल पाटील म्हणाले, 'निवृत्तीनंतर अनेकजण सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक क्षेत्रात काम करतात. इतरांचे आयुष्य सुखी होण्यासाठी धडपडण्याची प्रवृत्ती समाजातील चांगुलपणाचे लक्षण आहे.' डॉ. वाहूळ म्हणाले, 'प्राचार्य, शिक्षण सहसंचालक, विद्यापीठ कौन्सिल सदस्य व संघटनेमध्ये काम करताना नियमाच्या चौकटीत राहून लोकांना न्याय दिला. याबद्दल मनस्वी समाधानी आहे.' प्राचार्य शफी म्हणाले, 'अल्पसंख्याक महिलांसाठी शिक्षणाचे योगदान देता आले. ॲक्युरॅट संघटनेच्या माध्यमातून सर्वांसोबत काम करण्याची संधी मिळाल्यामुळे जीवन आनंदी झाले.' याप्रसंगी अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील, प्राचार्य डी. यू. पवार, प्राचार्य माद्याण्णा, डॉ. रुपा शहा आदींनी मनोगत व्यक्त केले. सेवानिवृत्त प्राध्यापक प्राचार्य संघटनेचे अध्यक्ष प्राचार्य मानसिंगराव जगताप यांनी प्रास्ताविक केले. प्रा. बी. आर. बोपे यांनी सूत्रसंचालन केले. उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे यांनी आभार मानले. प्रा. डॉ. गजानन राशिनकर यांनी कार्यक्रमाचे संयोजन केले.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाला बुधवारी रशियन विद्यार्थी व शिक्षकांनी भेट दिली. यावेळी त्यांच्यासमवेत डॉ. मेघा पानसरे व विद्यार्थी.

(छाया : पप्पू अत्तार)

# रशियन पाहुण्यांना शिवाजी विद्यापीठ कॅम्पसचे कौतुक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाचा कॅम्पस पाहून रशियन पाहुणे आनंदून गेले. विद्यापीठाची हेरिटेज इमारत आणि छत्रपती शिवाजी महाराजांचा भव्य आश्‍वारूढ पुतळा पाहून त्यांनी कुतूहलाने याबाबत विद्यापीठाच्या प्राध्यापकांकडून माहिती घेतली.

मिनिस्ट्री ऑफ फॉरेन अफेअर्स, मॉस्को, रशियन फेडरेशन या माध्यमिक शाळेतील शिक्षक चुबारोवा तत्याना, नतालिया बुरत्सेवा, पलिना बुदोर्ना, इरिना बिस्पालवा यांच्या समवेत बारा विद्यार्थ्यांनी बुधवारी शिवाजी विद्यापीठाला भेट दिली. सायंकाळी हे सर्व विदेशी भाषा विभागात दाखल झाले. शिवाजी विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी या पाहुण्यांचे स्वागत रशियन भाषेत केले. तसेच त्यांच्याशी संवादही रशियन भाषेतच केला. विदेशी भाषा विभागप्रमुख डॉ. मेघा पानसरे यांनी विभागाच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. यावेळी स्नेहा वझे, प्रियांका माळकर, शीतल कुलकर्णी, स्नेहल शेटे आदी उपस्थित होते.

दरम्यान, विदेशी भाषा विभाग व विद्यार्थी विकास विभाग यांच्या वतीने 'विथ लव्ह फ्रॉम रशिया' हा सांस्कृतिक कार्यक्रम वि. स. खांडेकर भाषा भवनमध्ये रात्री झाला. या कार्यक्रमात रशियन विद्यार्थ्यांनी सादरीकरण केले.

पुढारी



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने नियोजित 'छत्रपती शिवाजी' पुरस्कारासंदर्भात निवड समितीची बैठक बुधवारी विद्यापीठात झाली. बैठकीत कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, दैनिक 'पुढारी'चे मुख्य संपादक डॉ. प्रतापसिंह जाधव, ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. अनिल काकोडकर यांच्यासह डावीकडून धैर्यशील पाटील, डॉ. जयसिंगराव पवार, डॉ. यशवंत थोरात, डॉ. नागनाथ कोत्तापल्ले, अमित कुलकर्णी, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. विलास नांदवडेकर, डॉ. संजय पाटील, डॉ. भारती पाटील आदी.

(छाया : पप्पू अत्तार)

# विद्यापीठात इंटरनेट व्यसनमुक्ती केंद्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या पत्रकारिता आणि जनसंवाद विभागात 'इंटरनेट व्यसनमुक्ती केंद्रा'चे उद्घाटन व्यसनमुक्तीसाठी कार्यरत असलेल्या डॉ. अजय दुधाणे यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना दुधाणे म्हणाले, 'गेल्या काही वर्षांत मोबाइल फोन तरुणांसाठी व्यसन बनले आहे. अनेक तरुण इंटरनेटच्या आहारी गेले आहेत. यातून ते मानसिक रुग्ण बनले आहेत. इंटरनेट किंवा मोबाइल फोन मिळाला नाही तर मुले हिंसक बनू लागली आहेत. या सर्व बाबींचा विचार करुन तरुणांचे प्रबोधन करणे आवश्यक आहे. विद्यापीठातील या केंद्राचा तरुणांना निश्चितपणे उपयोग होईल. ज्येष्ठ पत्रकार डॉ. सुभाष देसाई, डॉ. राजेंद्र पारिजात, प्रसाद प्रभू, डॉ. निशा पवार, डॉ. शिवाजी जाधव, डॉ. सुमेधा साळुंखे आदी उपस्थित होते.